# शुद्ध देशी गोवंश संवर्धनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन

डॉ. तुषार भोसले, डॉ. दिनेश बिरारी, डॉ. समीर ढगे

प्रत्येक देशी जातीचे स्वतःचे मूळ कार्यक्षेत्र आणि आनुवंशिक वैशिष्ट्ये निश्चित आहेत. मात्र गेल्या काही दशकांत अनियोजित संकरीकरण आणि केवळ दुधाच्या तात्पुरत्या प्रमाणावर दिलेल्या भरामुळे शुद्ध देशी गोवंशाच्या संख्येत लक्षणीय घट झाली. या अमूल्य आनुवंशिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि व्यापक जनजागृतीची तातडीने गरज आहे.

भारतीय कृषी व्यवस्था, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जैविक विविधतेचा मुख्य कणा म्हणजे आपला देशी गोवंश. बदलते हवामान, वाढते तापमान आणि रोगांना प्रतिकार करण्याची नैसर्गिक क्षमता यामुळे देशी गोवंशाचे जतन ही काळाची गरज आहे. विसाव्या पशुगणना (२०१९) अहवालानुसार देशात एकीकडे संकरित जनावरांची संख्या वाढताना दिसत असली, तरी देशी दुभत्या गाईंच्या संख्येत १० टक्क्यांनी झालेली वाढ पशुपालकांचा देशी गोवंशावरील विश्वास पुनर्स्थापित करत आहे.

## वैज्ञानिक आणि पर्यावरणीय महत्त्व

- संकरित किंवा परदेशी गाईंच्या तुलनेत भारतीय देशी गाईंची शारीरिक व जनुकीय रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे.
- वाढते तापमान, उष्णतेचा ताण आणि अनियमित पावसाच्या परिस्थितीतही देशी गाईची शारीरिक कार्यक्षमता व उत्पादनक्षमता टिकून राहते.
- गोचीड, बाह्य परजीवी आणि विविध संसर्गजन्य आजारांविरुद्ध देशी गाईंमध्ये नैसर्गिक प्रतिकारशक्ती चांगली असते. यामुळे उपचारांवरील खर्च अत्यंत कमी येतो.
- रुक्ष किंवा कमी दर्जाच्या चाऱ्याचे पचन करून उत्तम पोषणमूल्ये तयार करण्याची क्षमता या गाईंमध्ये असते.
- स्थानिक परिसंस्था संतुलित राखण्यात आणि शाश्वत शेतीचा समतोल साधण्यात देशी गोवंशाचा मोठा वाटा आहे.

## शेती, आरोग्य आणि उद्योगातील उपयोग

- शेणखताचा वापर जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवण्यास फायदेशीर ठरतो. ज्यामुळे जमिनीची पाणी धारण क्षमता आणि सूक्ष्मजीवांची संख्या सुधारते.
- शेण, गोमूत्रापासून तयार केलेले जिवामृत, बीजामृत, घनजीवामृत आणि गांडूळ खत रासायनिक खतांवरील अवलंबित्व पूर्णपणे कमी करतात.
- देशी गाईंच्या दुधात मुख्यत्वे ए २ बीटा-केसिन हे प्रथिन आढळते, जे पचनासाठी हलके मानले जाते.
- देशी गाईच्या दुधापासून बनवलेले पारंपरिक तूप, लोणी व ताक यांना बाजारात विशेष मागणी आणि उच्च दर मिळतो.
- शेणाचा वापर करून बायोगॅस व सीबीजी निर्मितीद्वारे ग्रामीण भागात इंधन व वीजटंचाईवर मात करता येते.
- खिल्लार, डांगी व देवणी यांसारख्या जातींचे बैल कठीण हवामानात व डोंगराळ किंवा विषम भूभागावरही शेतीच्या मशागतीसाठी अत्यंत कार्यक्षम मानले जातात.

## भविष्यातील संधी

**राष्ट्रीय गोकूळ मिशनचा प्रभावी वापर**

- या योजनेअंतर्गत गोकूळ ग्राम आणि उन्नत आनुवंशिक तंत्रज्ञानाचा वापर करून देशी गाईंची दूध उत्पादकता वाढवणे शक्य आहे.

**डिजिटल पशुधन व्यवस्थापन**

- 'भारत पशुधन' पोर्टल आणि 'INAPH'च्या माध्यमातून प्रत्येक जनावराचे टॅगिंग करून आनुवंशिक नोंदी आणि लसीकरणाचा मागोवा घेणे.

**मूल्यवर्धन व ग्रामीण उद्योजकता**

- दुधाव्यतिरिक्त शेण-गोमूत्रावर आधारित उत्पादने, जैविक कीटकनाशके आणि सेंद्रिय खतांचे व्यावसायिक ब्रँडिंग करून ग्रामीण तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे.

## व्यावहारिक शिफारशी

- **नियोजनबद्ध शुद्ध पैदास :** संकरीकरण टाळून स्थानिक शुद्ध वंशावळीच्या वळूंचा कृत्रिम रेतनासाठी वापर करावा.
- **दुधाची स्वतंत्र बाजारपेठ :** देशी गाईंच्या दुधासाठी स्वतंत्र संकलन, प्रक्रिया आणि प्रमाणन व्यवस्था उभारून शेतकऱ्यांना योग्य दर मिळवून द्यावा.
- **चारा बँकांची उभारणी :** दुर्मीळ आणि स्थानिक चारा प्रजातींच्या लागवडीसाठी सामूहिक जमीन उपलब्ध करून देणे.
- **गो-पालक प्रोत्साहन योजना :** शुद्ध देशी जातींचे संगोपन करणाऱ्या पशुपालकांना विशेष प्रोत्साहन अनुदान व विमा संरक्षण देणे.



जातिवंत खिल्लार गोवंश संगोपन.

## देशातील गोवंशाची सद्यस्थिती

| घटक | आकडेवारी |
|---|---|
| एकूण गोवंश | १९३.४६ दशलक्ष (१.३ टक्के वाढ) |
| एकूण मादी गोवंश | १४५.९१ दशलक्ष (१८.६ टक्के वाढ) |
| संकरित/परदेशी गोवंश | ५१.३६ दशलक्ष (२९.३ टक्के वाढ) |
| देशी व अनिर्दिष्ट गोवंश | १४२.११ दशलक्ष |

(स्रोत : विसावी पशुगणना, २०१९, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, भारत सरकार)

**महत्त्वाचे निष्कर्ष**

- दुभत्या गाईंमध्ये सकारात्मक वाढ : २०१२ च्या तुलनेत २०१९ मध्ये देशी आणि अनिर्दिष्ट/ गावठी मादी गाईंच्या संख्येत १० टक्के वाढ झाली आहे. ही बाब देशी गोवंश संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत आशादायक आहे.
- देशी गोवंशामध्ये घट: देशातील एकूण देशी गोवंशात (नर व मादी मिळून) ६ टक्के घट झाली आहे, तरी २००७ ते २०१२ दरम्यान असलेला घटीचा दर (९ टक्के) आता २०१२ ते २०१९ दरम्यान ६ टक्क्यांवर खाली आला आहे. याचे प्रमुख कारण, शेतकऱ्यांचा संकरित आणि विदेशी गायी जोपासण्याकडे अधिक कल दिसून येत आहे. ही एक चिंताजनक बाब आहे.
- संकरित गोवंशातील वाढ : संकरित व परदेशी गाईंची संख्या २९.३ टक्क्यांनी वाढून ५१.३६ दशलक्ष झाली आहे, ज्यामुळे शुद्ध देशी गोवंशाच्या जनुकीय शुद्धतेचे रक्षण करण्याचे आव्हान अजूनही कायम आहे.

| आव्हाने | स्थिती |
|---|---|
| आनुवंशिक नोंदी | शुद्ध वंशावळीच्या नोंदी सर्वत्र उपलब्ध नाहीत. |
| आधुनिक प्रजनन तंत्रज्ञान | देशी जातींमध्ये प्रगत प्रजनन तंत्रज्ञानाचा वापर अजूनही मर्यादित आहे. |
| गुणवत्तेचे प्रमाणीकरण | गो-आधारित उत्पादनांसाठी एकसमान गुणवत्ता मानके व चाचणी व्यवस्था अपुरी आहे. |



साहिवाल गाय

## देशातील प्रमुख देशी गोवंश

प्रत्येक देशी जातीचे स्वतःचे मूळ कार्यक्षेत्र आणि आनुवंशिक वैशिष्ट्ये निश्चित आहेत. मात्र गेल्या काही दशकांत अनियोजित संकरीकरण आणि केवळ दुधाच्या तात्पुरत्या प्रमाणावर दिलेल्या भरामुळे शुद्ध देशी गोवंशाच्या संख्येत लक्षणीय घट झाली. या अमूल्य आनुवंशिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि व्यापक जनजागृतीची तातडीने गरज आहे.

भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या राष्ट्रीय पशू आनुवंशिक संसाधन ब्युरो या संशोधन संस्थेने दिलेल्या नोंदीनुसार भारतात सध्या ५५ नोंदणीकृत देशी गोवंश जाती आहेत. राष्ट्रीय स्तरावर गीर, साहीवाल, थारपारकर, कृष्णा व्हॅली, लाल सिंधी, कांकरेज, ओंगोल आणि राठी यांसारख्या जाती प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रामध्ये डांगी, देवणी, गवळाऊ, खिल्लार, लालकंधारी, कोकण कपिला आणि कठाणी हे देशी गोवंश विविध भौगोलिक प्रदेशांत विकसित झाले आहेत.

- डॉ. समीर ढगे, ९४२३८६३५९६
(सहयोगी प्राध्यापक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)